महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या रचनेतील बदल व त्याअनुषंगाने आर्टिकल्स ऑफ असोसिएशन आणि मेमोरँडम ऑफ असोसिएशन मध्ये बदल <u>करण्याचे अधिकार देण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक: मसवि ०९१७/प्र.क्र.२१७ /२-स,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२ ऑक्टोबर, २०१७.

<u>वाचा</u> :-१) शासन परिपत्रक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. मसवि १०२०००/प्रक्र ५११ /२-स, दि.१७.११.२०००

२) महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचे पत्र दि. ७.९.२०१७

<u>प्रस्तावना : -</u>

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाची स्थापना दि.१६.८.२००० रोजी झाली. तथापि, सद्यस्थितीमध्ये सदर महामंडळाची संचालक मंडळाच्या सभा वेळोवेळी विहीत वेळी न झाल्यामुळे कंपनी अधिनियम २०१३ नुसार सदर संचालक मंडळ अस्तित्वात रहात नाही अशी तरतूद आहे. त्याचप्रमाणे सदर महामंडळ हे महाराष्ट्र शासन अंगिकृत असल्याने नव्याने संचालक मंडळाची नियुक्ती राज्य शासनाने करणे आवश्यक आहे.

यापूर्वी संदर्भाधीन शासन परिपत्रक दिनांक १७.११.२००० नुसार संचालक मंडळाच्या रचनेत बदल करण्यात आला होता. त्यानुसार यापूर्वी असलेले संचालक मंडळ हे १८ संचालकांचे होते व त्यांचे अध्यक्ष मा. मुख्यमंत्री होते. संचालक मंडळाची संख्या जास्त असल्याने वारंवार महामंडळ संचालक मंडळाच्या बैठकीची व्यवस्था होऊ शकत नव्हती. त्यामुळे कंपनी अधिनियमातील अनेक तरतूदींबाबत अनियमितता होत होती. या अनियमिततेची पूर्तता त्वरेने करावयाची असल्याने अल्प संख्येचे संचालक मंडळ असणे गरजेचे झाले आहे. ही बाब विचारात घेऊन महामंडळाच्या रचनेत बदल करुन अल्प संख्येचे संचालक मंडळ नव्याने निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

यासंदर्भात महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचे संदर्भाधीन पत्र दि. ७.९.२०१७ अन्वये प्राप्त प्रस्ताव व महामंडळाची सद्यस्थिती विचारात घेता शासन परिपत्रक दि.१७.११.२००० अन्वये स्थापन करण्यात आलेल्या संचालक मंडळाच्या रचनेत बदल करुन खालीलप्रमाणे नव्याने संचालक मंडळाची नियुक्ती करण्यात येते आहे :-

i)	डॉ. विजय झाडे (सहकार आयुक्त व निबंधक)	अध्यक्ष
ii)	श्री संभाजी कडू -पाटील (साखर आयुक्त)	संचालक
iii)	डॉ. आनंद जोगदंड (पणन संचालक)	संचालक

तसेच शासनाने पुर्णवेळ महामंडळावर व्यवस्थापकीय संचालकाची नियुक्ती न केल्याने पुर्णवेळ नियुक्ती होईपर्यंत पणन संचालक यांचेकडे व्यवस्थापकीय संचालक पदाचा अतिरिक्त पदभार देण्यात येत आहे.

वरील प्रस्तावाचा विचार करता महामंडळाच्या Articles of Association व Memorandum of Association यामधील मुळ प्रमुख उद्दीष्टांमध्ये बदल न करता, महामंडळाला गरजेप्रमाणे Articles of Association व Memorandum of Association मध्ये वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०१२१२०६४८४९०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co- Operation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2017.10.12 11:54:55 +05'30'

(रमेश शिंगटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. मंत्री व मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव
३) मा. विधानसभा सदस्य / विधान परिषद सदस्य
४) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा / विधान परिषद, विधानभवन, मुंबई
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
८) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
९) निवड नस्ती (२ स).